निवडक



गाल्जिबाग : नदीकाठी बंधारा वाढीच्या प्रकल्पाच्या चालू कामाची पाहणी करताना सभापती रमेश तवडकर. बाजूला नारायण देसाई, विनय तुबकी, डाव्याबाजूने सुनील पैंगीणकर, उदय प्रभुगावकर व इतर.

## गाल्जिबाग नदीकाठी बंधारा प्रकल्पाच्या चालू कामाची सभापतीकडून पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २०** : माननीय सभापती आणि काणकोण मतदारसंघाचे आमदार डॉ. रमेश तवडकर यांनी गाल्जिबाग नदीकाठी बंधारा वाढीच्या प्रकल्पाच्या चालू कामाची पाहणी करण्यासाठी महालवाडा, पैंगीण येथे भेट दिली. यावेळी सभापती रमेश तवडकर, देवस्थान समिती अध्यक्ष उदय प्रभुगावकर, उपसरपंच सुनील पैंगीणकर, जेष्ठ भाजप कार्यकर्ते नारायण देसाई, श्रीस्थळ जैव विविधता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनय तुबकी, शिरीष पै, लोलयेंचे पंचसदस्य अजय लोलयेंकर, आनंदराव देसाई व अन्य उपस्थित होते.

या संदर्भात बोलताना सभापती रमेश तवडकर म्हणाले की, गाल्जीबाग नदीकाठी ही वेडी वाकडी वळणा- वळणाची संरक्षक भिंत अतिशय सुंदर दिसत असून दुसऱ्याबाजूने असलेली हिरवीगार खारफुटींची झुडुपे सौंदर्यात अजून भर पडत आहे. हा परिसर पर्यावरणदृष्ट्या पोषक असून या नदीकाठावर पर्यटक कुटीरे उभारल्यास चांगला रोजगार या ठिकाणी उपलब्ध होऊ शकतो.अशी पुष्टी श्री तवडकर यानी जोडली.

ह्या नदीकाठावर बांधण्यात येणारी संरक्षक भिंत व बंधारा प्रकल्प पूर संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि १५ हेक्टर लागवडीखालील जमिनीला खाऱ्या पाण्याच्या प्रवेशापासून वाचवण्यासाठी एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

ह्या प्रकल्पाचे बांधकाम सातत्याने प्रगतीपथावर आहे आणि स्थानिक रहिवासी आणि शेतकऱ्यांना कायमस्वरूपी यापासून फायदे मिळवून देण्यास मदत करणारा प्रकल्प ठरणार आहे.

## सांडपाणी जोडणीबाबत १५ आस्थापनांना नोटिसा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २० :** शहरातील अपार्टमेंट, व्यावसायिक आस्थापने आणि हॉटेल्सकडून उघड्यावर कचरा व सांडपाणी सोडण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी फोंडा नगरपरिषदेने (पीएमसी) कठोर पावले उचलली आहेत. या संदर्भात १५ आस्थापनांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, पाणीपुरवठा खंडित होऊ नये यासाठी तात्काळ सांडपाणी जोडणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, १५ एमएलडी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) गेल्या वर्षभरापासून कार्यरत असूनही अनेक आस्थापने व निवासी संकुले सांडपाणी व्यवस्थापनास हलगर्जीपणा दाखवत आहेत. पीएमसीच्या निरीक्षणात असे आढळले की सुमारे ८८ इमारती उघड्यावर सांडपाणी सोडत आहेत, त्यामुळे सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण धोक्यात आले आहे.

पीएमसीचे मुख्य अधिकारी योगीराज गोसावी यांनी सांगितले की,१५ आस्थापनांना डिस्कनेक्शन नोटिसा पाठविल्यानंतर काही इमारतींनी सांडपाणी जोडणीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नगरपरिषदेचे अंतिम उद्दिष्ट शहरातील १०० टक्के निवासी इमारतींना एसटीपी प्रकल्पाशी जोडणे हे आहे.

गोसावी म्हणाले की, शहरातील अनेक हॉटेल्स आणि व्यावसायिक आस्थापने सर्रासपणे सांडपाणी नाल्यांमध्ये आणि गटारांमध्ये सोडत आहेत. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून, दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे स्थानिक रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. काही ठिकाणी सेप्टिक टँक ओव्हरफ्लो होण्याच्या घटना देखील घडल्या आहेत. पीएमसीने उघड्यावर सांडपाणी वाहण्यास प्रतिबंध घालण्यासाठी सात दिवसांची अंतिम मुदत दिली आहे. या कालावधीत सांडपाणी व्यवस्थापन सुधारण्यात अपयशी ठरलेल्या आस्थापनांच्या पाणीपुरवठ्यावर कारवाई केली जाणार आहे.

नगरपरिषदेकडून रहिवाशांना आणि व्यावसायिकांना तातडीने सांडपाणी जोडणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बंगल्यांसाठी, अपार्टमेंटसाठी तसेच हॉटेल आणि रेस्टॉरंट्ससाठी हे बंधनकारक असून, संबंधितांनी त्वरित उपाययोजना कराव्यात असे सांगण्यात आले आहे. गोसावी यांनी सांगितले की, ऑक्टोबर महिन्यात नगरपरिषदेकडून सांडपाणी महामंडळासोबत बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी डिसेंबरपर्यंत सर्व आस्थापनांनी सांडपाणी जोडणीसाठी अर्ज करावा, असा आदेश देण्यात आला होता. मात्र, आजपर्यंत केवळ २०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

सांडपाणी जोडणीसाठी जे शुल्क आणि दंडाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत त्यामध्ये प्रत्येक अपार्टमेंटसाठी ३,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे . तसेच हॉटेल आणि व्यावसायिक आस्थापनांसाठी वेगवेगळे दर लागू आहेत. शिवाय पाणी बिलाच्या ३५% शुल्क सांडपाणी व्यवस्थापनासाठी आकारले जाणार आहे. शुल्क न भरल्यास ५०% अतिरिक्त दंड आणि संभाव्य सेवा खंडित करण्याचा इशारा देण्यात आला आहे

# मडगाव नगरपरिषदेच्या दुर्लक्षावर पुन्हा सवाल

## फोंड्यात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात चिमुकलीचा मृत्यू राज्यात संतापाची लाट उसळली

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २०** : फोंडा येथे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात एका चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर राज्यात संतापाची लाट उसळली असून, या पार्श्वभूमीवर मडगाव नगरपरिषदेच्या कार्यक्षमतेवर आणि निष्क्रियतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मडगावसारख्या व्यावसायिक राजधानीत भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढत असताना, कुत्र्यांच्या अन्नद्रव्य व नियंत्रणासाठी असलेल्या एबीसी (प्राणी जन्म नियंत्रण) कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत मडगाव नगरपरिषदेचा संथ व उदासीन दृष्टिकोन ठळकपणे समोर आला आहे.

मडगाव नगरपरिषद आणि एका स्थानिक प्राणी कल्याण संस्थेमध्ये एबीसी कार्यक्रम राबवण्यासाठी एक सामंजस्य करार करण्यात आला होता. मात्र, या कराराला एक वर्ष लोटूनही तो प्रत्यक्षात अमलात आलेला नाही. माजी मुख्य अधिकारी गौरिश शंखवाळकर यांच्या कार्यकाळात ही प्रक्रिया कोणतीही पूर्वसूचना न देता पूर्ण करण्यात आली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सदर एनजीओ ने डिसेंबर २०२४ पर्यंतचे खर्च सादर केले होते. मात्र, महानगरपालिकेकडून अद्याप एकही पेमेंट झालेले नाही. या विलंबामुळे संस्थेच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम झाला असून, कुत्रे पकडणारे कर्मचारी सेवा बंद करण्यास भाग पडले आहेत.




महानगरपालिकेने कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी मागील वर्षी एक रिक्षा वाहनाचे रूपांतर करीत त्यास कुत्रे पकडण्यासाठी आवश्यक अशा 'व्हॅन'मध्ये बदलले होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून सदर व्हॅन सोनसोडो कचरा व्यवस्थापन केंद्रात निष्क्रिय अवस्थेत पडून होती. आता माहिती समोर येत आहे की सदर व्हॅनचा वापर टायर वाहतुकीसाठी करण्यात येत आहे, जी एक गंभीर बाब मानली जात आहे.

शहरात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, अनेक भागांत नागरिकांना दररोज त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरीही महानगरपालिकेने अद्याप या विषयावर ठोस कृती आराखडा तयार केलेला नाही. स्वयंसेवी संस्थेसोबतचे करार असूनही त्या संस्थेला आवश्यक सहाय्य न देणे ही मनपाची उदासीनता स्पष्ट करते.

मडगावकर नागरिक आणि स्वयंसेवी संस्था यांच्याकडून आता मनपावर थेट सवाल उपस्थित करण्यात येत आहेत . जर मनपाला हा करार अंमलात आणायचा नव्हता, तर तो करार का केला गेला? कोणतेही स्वारस्य अभिव्यक्ती न करता थेट करार करण्यामागे कोणते कारण होते? भटक्या कुत्र्यांच्या मदतीसाठी एखादी हेल्पलाइन का सुरू करण्यात आलेली नाही? उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे. यानुसार, मडगाव नगर परिषदेला अधिक सक्रिय भूमिका बजावणे अपेक्षित होते. मात्र, एनजीओ सोबतचा करार झाल्यानंतर, मनपाने आपली जबाबदारी झटकून टाकल्याचे चित्र सध्या समोर आले आहे.

शहरातील सर्वच भागांत भटक्या कुत्र्यांची समस्या तीव्र आहे. अशा स्थितीत, नगरसेवक तसेच सत्ताधारी भाजपच्या नेतृत्वाखालील मनपा प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आली असून, या पार्श्वभूमीवर तत्काळ उपाययोजना अपेक्षित आहेत.

# खोतीगाव चेकपोस्ट प्रकरण; नागरिक संघटनेचा आंदोलनाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. २०** : पिपळामळ – खोतीगाव येथील प्रस्तावित चेकपोस्टच्या पार्श्वभूमीवर खोतीगाव जागृत नागरिक संघटनेने सभापती आणि काणकोणचे आमदार रमेश तवडकर यांच्यावर जोरदार टीका करत बांधकाम त्वरित थांबवण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

शनिवारी चावडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी आमदार तवडकर यांच्या चेकपोस्टविषयक वक्तव्याचा निषेध केला. आमदार तवडकर यांनी चेकपोस्ट असल्यास लाकडाची तस्करी होणार नाही, असे विधान केले होते. यावर प्रतिक्रिया देताना संघटनेचे कल्पेश गावकर म्हणाले, तवडकर यांचे विधान खोतीगाव मधील सर्व ग्रामस्थांवर संशयाचे ढग निर्माण करणारे आहे. आम्ही या विधानाचा तीव्र निषेध करतो.

गावकर यांनी स्पष्ट केले की, खोतीगाव मधील कोणताही ग्रामस्थ लाकूड चोरण्याच्या प्रकारात सहभागी नाही. वन विभागाच्या परतगळ, भाटपाल आणि आंबे घाट येथे आधीपासून चेकपोस्ट कार्यरत आहेत. आमदारांनी जर कुणावर संशय असेल, तर त्यांनी त्याचे नाव जाहीर करावे.

तसेच, गावकर यांनी आमदार तवडकर यांच्यावर दुटप्पी भूमिका घेतल्याचा आरोप करत म्हटले, जेव्हा ग्रामस्थांनी बेकायदेशीर बांधकाम थांबवण्याची मागणी केली, तेव्हा तवडकर स्वतः घटनास्थळी येऊन काम थांबवण्याचे आदेश दिले होते. आता मात्र तेच या चेकपोस्टला विरोध करण्याचे कारण नाही, असे म्हणत आहेत. ही भूमिका समजण्यासारखी नाही. संघटनेने पिपळामळ येथे सुरू असलेले बांधकाम त्वरित थांबवण्याची मागणी केली असून, त्याकडे दुर्लक्ष झाल्यास संपूर्ण मतदारसंघाच्या पाठिंब्याने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. चेकपोस्टच्या समर्थनात वन विभागाने केलेल्या विधानांवरही टीका करण्यात आली. एका व्यक्तीकडून गुळ निर्मितीसाठी ट्रकभर लाकूड मागवले जात आहे, या दाव्याविषयी प्रश्न उपस्थित करत, संघटनेच्या सदस्यांनी सांगितले की, गावात हंगामी गूळ उत्पादन प्रकल्पांव्यतिरिक्त, काजू डिस्टिलेशन युनिट्स आणि इतर उद्योग आहेत, ज्यांना लाकडाची गरज असते. गावकरी मुख्यतः जंगलातील सुक्या लाकडाचा वापर करतात.

वन विभागाने आजवर कोणतीही अधिकृत तपासणी केली नाही. मग निष्पक्ष तपासाशिवाय जबाबदार अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे आरोप करणे कितपत योग्य आहे? असा सवाल एका स्थानिक रहिवाशाने उपस्थित केला.

तसेच त्यांनी वन विभागाच्या धोरणांवर नाराजी व्यक्त करत सांगितले की, पिढ्यानपिढ्या येथे राहणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक मार्गांवर जाण्याची मुभा दिली जात नाही. पण बाहेरून येणाऱ्यांसाठी मात्र जंगलात रस्ते बांधले जात आहेत. नडके – केरी गावात अद्याप रस्ता नाही, पानसुलेमाल गावातील रस्ता अपूर्ण आहे, तर मल्ली गावातील नागरिकांनी मागील लोकसभा निवडणुकीत रस्त्याच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार टाकल्याची आठवण देखील यावेळी करून देण्यात आली.या पत्रकार परिषदेत दिलकुश गावकर, गजानन वेळीप आणि कृष्णा गावकर हे ही उपस्थित होते आणि त्यांनीही आपली भूमिका स्पष्टपणे मांडली.

# आश्वे मांद्रे येथील भूमिका देवस्थान वर्धापनदिनावरून वाद



■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २०** : आश्वे मांद्रे येथील श्री भूमिका देवस्थानाचा वर्धापन दिन २१ एप्रिल रोजी पार पडणार असून, हा उत्सव कोण साजरा करावा यावरून दोन गटांत मतभेद निर्माण झाले आहेत. वादाची शक्यता लक्षात घेता पेडणेचे मामलतदार अनिल राणे आणि मांद्रे पोलीस निरीक्षक श्री. नाईक यांनी घटनास्थळी उपस्थित राहून कायदा –सुव्यवस्थेचा आढावा घेतला.

श्री भूमिका मंदिर हे श्री भगवती सप्तेश्वर पंचायतन देवस्थानच्या अखत्यारीत येते. देवस्थान समितीच्या प्रमुखांनी सुदेश सावंत यांच्या गटाला पूजा करण्यासाठी अधिकृत पत्र दिले होते. मात्र देवस्थानच्या बायलॉजमध्ये वर्धापनदिन साजरा करण्यासंदर्भात कोणताही नियम नाही. याच मुद्द्यावरून दुसऱ्या गटाने आक्षेप नोंदवल्याने वातावरणात तणाव निर्माण झाला.

या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांनी वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला मंदिरात उपस्थिती लावली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप केला. मामलतदार अनिल राणे यांनी सुदेश सावंत गटाला कोणताही सार्वजनिक उत्सव न साजरा करण्याचे स्पष्ट आदेश दिले. मात्र, नियमित पूजा–अर्चा देवस्थान बायलॉजनुसार पार पाडण्यास परवानगी देण्यात आली.

सावंत गटाने प्रशासनाच्या सूचनेनुसार मंदिरातून शांततेत माघार घेतली. त्यानंतर दुसऱ्या गटाने गर्भगृहाचे दरवाजे उघडे ठेवण्याची विनंती केली, कारण काही भक्तगण नियमित पूजेसाठी येणार होते. मामलतदारांनी यास मान्यता देत दिवसभरासाठी मंदिर भक्तांसाठी खुले ठेवले.

दरम्यान, वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा होणार नाही, असे अधिकृतरीत्या स्पष्ट करण्यात आले आहे. सुदेश सावंत गटाने सांगितले की, केवळ सकाळची पारंपरिक पूजा आणि अभिषेक होईल, मात्र इतर कोणताही उत्सव किंवा सार्वजनिक कार्यक्रम साजरा केला जाणार नाही. या प्रसंगी काही महिला भक्त मोठ्या संख्येने मंदिर परिसरात उपस्थित होत्या. वादाची शक्यता लक्षात घेता महिला पोलिसांची अनुपस्थिती जाणवली. मात्र नंतर एक महिला पोलीस कॉन्स्टेबल घटनास्थळी दाखल झाली.

देवस्थानच्या बायलॉजनुसार केवळ दोन अधिकृत उत्सवांचा उल्लेख आहे. वर्धापन दिनासारख्या इतर कार्यक्रमांचा कोणताही लेखी उल्लेख नसल्याने, कोणाला हा उत्सव साजरा करण्याचा अधिकार आहे, यावरून वाद उद्भवले आहेत.

या संपूर्ण परिस्थितीत पेडणेचे मामलतदार अनिल राणे आणि मांद्रे पोलिस निरीक्षक यांनी तत्परता दाखवत परिस्थिती नियंत्रणात ठेवली. त्यांच्या उपस्थितीत कोणताही अनुचित प्रकार घडू न देता शांतता राखण्यात प्रशासनाला यश आले.

# वाढदिवस साजरा करताच भीषण अपघातात मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २०** : न्हयबाग पोरस्कडे येथील भगवान उत्तम कासकर (वय २५) यांचा सातारा जिल्ह्यातील एका भीषण अपघातात मृत्यू झाला. या घटनेमुळे न्हयबाग पोरस्कडे परिसरात शोककळा पसरली आहे.

भगवान कासकर यांचा २० एप्रिल रोजी वाढदिवस होता. या प्रसंगी, शिर्डी येथील साईबाबांच्या दर्शनासाठी ते आपल्या मित्रांसोबत शिर्डीच्या प्रवासाला निघाले होते. १९ एप्रिल रोजी रात्री ११.३० वाजता साताऱ्यातील एका हॉटेलमध्ये त्यांनी जेवण केले आणि वाढदिवसाचा केक कापला. त्याचवेळी, रस्त्याच्या बाजूला पार्क



केलेल्या त्यांच्या वाहनाकडे जात असताना एक ट्रक सुसाट वेगाने आला.

आश्चर्यकारकपणे, या ट्रकने प्रथम एक वीज खांबाला धडक दिली आणि उलटला . हे चौघेजण त्याच मार्गाने जात असताना तिघेजण बचावले, मात्र भगवान कासकर या युवकाला या ट्रकने चिरडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. सातारा पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून, या अपघातात भगवान कासकर यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

भगवान कासकर हे रेती व्यवसायात काम करत होते. ते कुटुंबीयांचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ होते. त्यांच्या पश्चात चार बहिणी आणि एक लहान भाऊ कुटुंबात आहेत. कुटुंबीयांच्या आणि नातेवाईकांच्या डोळ्यात अश्रूंचा पूर आहे. मृतदेह ताब्यात घेण्यासाठी २० एप्रिल रोजी कुटुंबीय सातारा परिसरात दाखल झाले. देवदर्शनासाठी निघालेल्या भगवान कासकर यांच्यावर दुखद वळणावर काळाने हल्ला केल्यामुळे कासकर कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# गोव्यात पारंपरिक व्यवसायांचा अस्त, स्थलांतरित मजुरांची वाढ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : गोव्याच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेचा आधारस्तंभ असलेले पारंपरिक व्यवसाय, जसे की शेती, सुतारकाम, दगडी बांधकाम, प्लंबिंग, विणकाम, बेकिंग, शिवणकाम, पेंटिंग इत्यादी आज नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत. एकेकाळी पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या या व्यवसायांना आता स्थानिक तरुणांची पाठिंबा नाही आणि त्यांची जागा देशभरातून आलेल्या स्थलांतरित कामगारांनी घेतली आहे.

या बदलामागे अनेक घटक कारणीभूत आहेत. शिक्षण, करिअर आणि जीवनशैलीबाबत गोव्यातील कुटुंबांचे दृष्टिकोन गेल्या दशकात मोठ्या प्रमाणात बदलले आहेत. व्हाईट कॉलर नोकऱ्यांची आकर्षक प्रतिमा आणि परदेशात शिक्षण घेण्याची स्वप्ने यामुळे तरुण पिढी पारंपरिक कौशल्यांपासून दूर झाली आहे. परिणामी, ही कामं पूर्वीप्रमाणे प्रतिष्ठेची न राहता मागास समजली जात आहेत.



शेती, बांधकाम व इतर क्षेत्रांमध्ये यांत्रिकीकरणामुळे मानवी श्रमाची गरज कमी झाली आहे. हाताची कला आणि कौशल्याला मागणी कमी झाली, ज्यामुळे परंपरागत कामांमधील नव्या पिढीचा रसही ओसरला आहे. अनेकांनी आपल्या पूर्वजांनी वापरलेली साधने आणि यंत्रे बंद करून ठेवली आहेत, जी आता या व्यवसायांच्या मरणासन्न अवस्थेचे प्रतीक बनली आहेत.

या रिक्त जागा भरून काढण्यासाठी स्थलांतरित मजुरांनी गोव्यात प्रवेश केला आहे. उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळ या राज्यांतून आलेले कुशल व अकुशल कामगार आता गोव्याच्या बांधकाम, शेती व घर दुरुस्ती उद्योगाचा कणा बनले आहेत.

मडगाव हे चांगल्या परिवहन सुविधांमुळे स्थलांतरित कामगारांसाठी विशेष आकर्षण बनले आहे. येथे रेफरल्स आणि बांधकाम साइटवर थेट भेट देऊन काम मिळवले जाते. रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकामुळे मडगाव एक सोयीचे ठिकाण ठरले आहे. उत्तर प्रदेशातील एका सुताराने सांगितले,



इथे पोहोचणं सोपं आहे आणि कामही सतत मिळतं.म्हापसा येथे दररोज पहाटे शेकडो कामगार मुख्य चौकांवर कामाच्या शोधात उभे राहतात. त्यांच्या दरांमध्ये लिंग, कौशल्य आणि कामाच्या स्वरूपानुसार फरक असतो. महिलांना ७०० रुपये, पुरुष मदतनीसांना ९०० रुपये आणि कुशल कारागिरांना १,२०० ते १,५०० रुपये दररोज मिळतात.

हे कामगार आपापल्या राज्यांनुसार अनौपचारिक गटांमध्ये उभे राहतात. ही सामाजिक संघटना त्यांना एकमेकांशी जोडून ठेवते आणि अपरिचित वातावरणात सामंजस्य साधण्यास मदत करते.

फोंडा येथील केटीसी बस स्थानक परिसरात दररोज सुमारे ४०० कामगार कामाच्या शोधात येतात. स्थानिक कंत्राटदार आणि व्यापाऱ्यांना हे कामगार सहज उपलब्ध होतात. काही कुशल मजूर आता उपकंत्राटदारही झाले असून, आपल्या सोबत पथके घेऊन कामावर जातात.

या मजुरांना दररोज काम मिळत असले तरी त्यांचे राहणीमान अत्यंत अस्वस्थ करणारे आहे. साळगांव , गिरी , बस्तोडा व म्हापसा परिसरात टिनच्या शेडमध्ये आठ–दहा मजूर एकत्र राहत असून स्वच्छतेची आणि गोपनीयतेची सोय नाही. तरीही, त्यांच्या उत्पन्नामुळे ते आपल्या कुटुंबाला गावी आर्थिक आधार देऊ शकतात. त्यामुळे गोव्यातील कमाई म्हणजे पात्राव डॉलर्स' अशी त्यांच्यात म्हण प्रचलित झाली आहे.

गोव्यातील या बदलत्या श्रमपरिस्थितीमुळे एक मोठा सामाजिक व सांस्कृतिक संक्रमण घडत आहे. पारंपरिक कामांचे ज्ञान, कौशल्य आणि वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. या व्यवसायांना पुन्हा प्रोत्साहन देण्यासाठी सरकारकडून व्यावसायिक प्रशिक्षण, कौशल्यविकास योजना आणि जनजागृती मोहीम राबवण्याची गरज आहे.गोव्यात स्थलांतरित मजुरांनी भरलेली ही कामाची पोकळी एकीकडे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देत असली तरी, दुसरीकडे पारंपरिक कामगार वर्गाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. जर या व्यवसायांचे जतन लवकर झाले नाही, तर गोव्याची समृद्ध पारंपरिक कामांची संस्कृती केवळ आठवणीत शिल्लक राहील.

